२८-४-२०१२

# शेतीचा शोध लावण्यात महिलांचे योगदान

## ■ कमला कॉलेजच्या कार्यशाळेत डॉ. तारा भवाळकर यांचे प्रतिपादन

**कोल्हापूर ■ म. टा. प्रतिनिधी**
matakolhapur@indiatimes.com

प्रारंभीच्या कालखंडापासून महिलांनी शेतीचा शोध लावून महत्त्वाचे योगदान दिले आहे. देशाच्या अर्थ नियोजनात व जलसंधारणामध्ये महिलांना संधी दिल्यास देशाची प्रगती वेगाने होईल, असा विश्वास लोक साहित्याच्या अभ्यासक तारा भवाळकर यांनी व्यक्त केला.

शिवाजी युनिव्हर्सिटी सुवर्ण महोत्सवानिमित्त शिवाजी युनिव्हर्सिटी व कमला कॉलेजच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'राष्ट्रीय विकासातील महिलांचे योगदान' या विषयावरील कार्यशाळेप्रसंगी त्या बोलत होत्या. कार्यशाळेचे उद्घाटन शिवाजी युनिव्हर्सिटीचे कुलगुरु डॉ.एन.जे.पवार यांनी केले.

भूमी,पाणी, नैतिकता या सर्वांचे रक्षण आणि संवर्धन करणे हीच खरी संस्कृती आहे. समाज व संस्कृती बांधणी स्त्रीशिवाय शक्य नसल्याचे भवाळ यांनी सांगितले.

कुलगुरु डॉ. एन.जे पवार म्हणाले, भारतीय राज्यघटनेने समानतेचा संदेश दिला आहे. स्त्री-पुरुष समान हक्कामुळे आज महिला राजकीय,सामाजिक, औद्योगिक क्षेत्रात आपला प्रभाव टाकत आहे. जोतिबा आणि सावित्रीबाई फुले यांच्यामुळे महिलांना शिक्षणाची संधी मिळाली. स्वातंत्र्यानंतर मनुष्यबळ विकासाला चालना मिळाली. माहिती तंत्रज्ञानाच्या युगात ३८ टक्के महिलांचे योगदान आहे.

प्राचार्य क्रां तीकुमार पाटील म्हणाले, या कार्यशाळेमुळे स्त्रियांच्या विकासाला चालना मिळेल. त्यासाठी विद्यापीठ ही महिलांना समर्थ करण्याच्या हेतूने कार्य करणारी शैक्षणिक संस्था आहे . महिलांच्या बचत गट, महिला उद्योगामुळे राष्ट्रीय विकासाला चालना मिळाली आहे.

महिलांनी जीवनाच्या सर्वच क्षेत्रात मोठे योगदान दिले आहे. घटनेच्या १४ व्या कलमानुसार स्त्री-पुरूष समान हक्क मिळत आहे. त्यामुळे महिलांनी विविध क्षेत्रात आपला प्रभाव दाखवला असल्याचे ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ.जे. एफ.पाटील यांनी सांगितले.डॉ.भालबा विभुते म्हणाले, पूर्वीपासून महिला राजकारणात आहेत. सरकारच्या अनेक योजनांच्या माध्यमातून ग्रामीण भागाचा विकास करण्याचा प्रयत्न महिलांनी केला आहे.

यावेळी प्रा.तेजस्विनी मोडेकर, प्रा.ए.एम. साळोखे, प्रा. अनिल घस्ते, प्रा. रेखा पंडित, प्रा. एस.व्ही.बागल,प्रा.भारती शेळके आदी उपस्थित होते. प्रा. नीता धुमाळ यांनी प्रास्ताविक केले. डॉ. भारती शेळके यांनी आभार मानले.



कोल्हापूर : राष्ट्रीय विकासातील महिलांचे योगदान या एकदिवसीय कार्यशाळेत बोलताना कुलगुरू डॉ. एन.जे.पवार. सोबत क्रांतिकुमार पाटील, डॉ. भालबा विभूते , तारा भवाळकर.

# राष्ट्रीय विकासात महिलांचे योगदान महत्त्वाचे

## कुलगुरू डॉ. एन. जे. पवार यांचे प्रतिपादन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

राष्ट्रीय विकासात महिलांचे योगदान मोलाचे असून, महिला या समाजाच्या महत्त्वपूर्ण घटक आहेत, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. एन.जे. पवार यांनी केले.शिवाजी विद्यापीठ व कमला महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राष्ट्रीय विकासातील महिलांचे योगदान या एकदिवसीय कार्यशाळेच्या उद्घाटन समारंभात ते बोलत होते.

डॉ. पवार पुढे म्हणाले, राष्ट्रीय विकासात महिलांचा वाटा मोलाचा आहे. हवाई क्षेत्र, वैद्यकीय,तंत्रज्ञान क्षेत्राबरोबरच शेतीच्या आधुनिक पद्धतीत महिलांचा वाटा हा महत्त्वाचा आहे. देशाच्या [illegible] ज्या महिलांनी भाग घेतला, त्यांच्या कार्याचा आढावा त्यांनी घेतला.

अध्यक्षीयभाषणातप्राचार्यक्रांतिकुमार पाटील यांनी राष्ट्रीय कार्यशाळेचे महत्त्व विषद केले. या संस्थेने ताराराणी भद्रकाली पुरस्कार देऊन अनेक स्त्रियांच्या कार्याचा गौरव केल्याचे सांगितले. प्रथम सत्रात अर्थतज्ज्ञ जे. एफ. पाटील यांनी राजकारण समाजकारणाबरोबरच अर्थकारणातही महिलांचा सहभाग मोठा असल्याचे सांगितले.

यावेळी डॉ. भालबा विभूते, सामाजिक कार्यकर्त्या तारा भवाळकर यांनी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सौ. नीता धुमाळ यांनी केले. ओळख तेजस्विनी मुडेकर यांनी तर आभार भारती शेळके यांनी मानले